भारतीय गैर न्यायिक
भारत INDIA
रु. 500 FIVE HUNDRED RUPEES
पाँच सौ रुपये Rs. 500
सत्यमेव जयते
INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2020 ◐

NAGPUR TREASURY
BB 649955
29 JUN 2021

NOTARIAL REG.
ENTRY NO. 5350
DATE 10/7/2021

NOTARY
PURUSHOTTAM N. BORKUTE
NAGPUR DISTT (M.S.)
GOVT. OF INDIA

# भागीदारीचा विलेख

भागीदारीचा हा विलेख दिनांक ०२ जुलै इ.स. २०२१ रोजी

१. **श्री. संजय वल्द मधुकरराव महाकाळकर.**
वय सुमारे ४७ वर्षे, धंदा—व्यवसाय.
आधार न.— ३३७६ ५५५५ १९१५
पॅन न.— AEDPM9631E
रा. प्लॉट न. १७, रीज रोड, रघुजी नगर,
नागपूर—४४००२४
**त. आणि जि. नागपूर (महा.)**

(यात यापुढे पक्ष क्र. १ असे उल्लेखित)

२. **श्री. नंदलाल वल्द हरिलाल शाहू**
वय सुमारे ४४ वर्षे, धंदा—व्यवसाय.
आधार न.— ४०११ २३०७ ०६२४
पॅन न. — BQFPS8260J
रा. घर न. ३५७०, वाठोडा रोड, पावर हाऊस जवळ,
न्यु. पन्थर नगर, नागपूर—४४०००८
**त. आणि जि. नागपूर (महा.)**
**(यात यापुढे पक्ष क्र. २ असे उल्लेखित)**

(वरील पक्षांस यात यापूढे **"भागीदार"** असे संबोधिले असून, संदर्भ विपरीत नसता, त्यात त्यांचे वारस, उत्तराधिकारी, निष्पादक, प्रशासक व अभ्यर्पिती यांचा समावेश आहे.) यांजमध्ये झाला असून

ज्याअर्थी वरील पक्षाची, भागीदारीत **विकास आणि इतर व्यवसाय** अशा स्वरूपाचा व्यवसाय. चालविण्याची मनीषा आहे व

ज्याअर्थी मान्य झालेल्या अटी व शर्ती आता लेखी स्वरुपात उतरविणे श्रेयस्कर मानण्यात आले आहे.

त्याअर्थी आता हा विलेख खालीलप्रमाणे प्रमाणभूत आहे.

१. **व्यवसायाचे नांव** : व्यवसाय **"शिवलक्ष्मी लॅन्ड डेव्हलपर्स"** या नामाभिधानाने चालविला जाईल. ज्याचा उल्लेख यांत यापूढे प्रतिष्ठान असा केला आहे.

२. **अंमलात येण्याचा दिनांक** : या विलेखातील अटी व शर्ती **०१ जुलै इ.स. २०२१** पासून अंमलात येतील.

३. **व्यवसायाची जागा** : व्यवसायाचे मुख्य ठिकाण **प्लॉट न. १७, रीज रोड, रघुजी नगर, नागपूर—४४००२४, त आणि जि. नागपूर (महा.)** येथे जरी असेल तरी भागीदार परस्पर संमतीने ठरवतील अशा अन्य ठिकाणी व्यवसाय चालविला जाईल.

नंदलालशाहू

४. **व्यवसायाचे स्वरुप** : भागीदारी संस्थेचे स्वरूप **इमारत बांधकाम, घराचा आणि/किंवा व्यापारविषयक जमिनीच्या भागाचा विकास करणे,** कृषिविषयक जमिन, जमिनीचा भाग, दुकान, **व्यापारी मंडळ, खोली/स्वतंत्र खोल्या इत्यादींची खरेदी व विक्री करणे आणि इमारत बांधकाम व जमिनीच्या चित्राच्या कामाचा अंतर्भाव असलेले इतर उद्योग करणे आणि इतर व्यवसाय** असे राहील. भागीदार परस्पर वेळोवेळी ठरवतील इतर व्यवसाय करणे असा राहील.

५. **भांडवल** : प्रतिष्ठनाचे प्रारंभीचे भांडवल रु. ५०,०००/– **(अक्षरी रुपये पन्नास हजार फक्त)** आहे जे भागीदार खालीलप्रमाणे आणतील. भविष्यात ज्यावेळी व ज्याप्रमाणे अतिरिक्त भांडवलाची आवश्यकता भासेल त्यावेळी भागीदार परस्परांत ठरवतील त्या प्रमाणांत भांडवलात अंशदान करतील.

| | | |
|---|---|---|
| १. | **श्री. संजय वल्द मधुकरराव महाकाळकर.** | रू. २५,०००/– |
| २. | **श्री. नंदलाल वल्द हरिलाल शाहू** | रू. २५,०००/– |
| | **एकूण** | ५०,०००/– |

६. **लाभ/हानीचे हिस्से** : भागीदार लाभ/हानी खालील प्रमाणे वाटून घेतील.

| | | |
|---|---|---|
| १. | **श्री. संजय वल्द मधुकरराव महाकाळकर.** | ५०% |
| २. | **श्री. नंदलाल वल्द हरिलाल शाहू** | ५०% |
| | | १००% |

७. **लेखा वर्ष** : प्रतिष्ठान आर्थिक वर्षाचे लेखा वर्ष दरवर्षी ३१ मार्च रोजी संपेल.

८. **भागीदारांचे पारिश्रमिक** : दोन्ही भागीदार प्रतिष्ठानाच्या व्यवसायात भाग घेतील. प्रतिष्ठानास दिलेल्या सेवांच्या प्रतिफल स्वरुप, भागीदार प्रतिष्ठानाकडून पारिश्रमिक मिळण्यास पात्र राहतील ज्याची रक्कम भागीदार वेळोवेळी परस्पर संमतीने ठरवतील. परंतू भागीदारांस देय सकल पारिश्रमिकाची राशी, वेळोवेळी संशोधित आयकर अधिनियम १९६१ च्या कलम ४०(ब) मध्ये उधृत केलेल्या मर्यादांचे उल्लंघन कधीच करु शकणार नाही. पारिश्रमिक वार्षिक असून त्यांच्या हिश्श्याला येणाऱ्या नफ्याच्या व्यतिरिक्त राहील. कार्यरत भागीदारांस देय वार्षिक आयकर अधिनियम १९६१ च्या कलम ४०(ब) नुसार दिले जाईल.

९. **भांडवल, कर्ज इ. वरील व्याज** : भागीदारांस त्यांच्या भांडवल/कर्ज खात्यावरील किंवा त्यांच्या अन्य खात्यातील जमा बाकी वर दरसाल १२ दराने किंवा आयकर, अधिनियम १९६१ च्या वेळोवेळी संशोधित कलम ४० (ब) प्रमाणे अनुज्ञेय महत्तम दराने व्याज देय राहील. वरील दरानेच भागीदारांच्या भांडवल/कर्ज वा इतर खात्यांमधील नावे बाकीवर व्याज आकारले जाईल. जर भागीदार परस्पर संमतीने ठरवतील तर त्याच्या भांडवल/कर्ज वा इतर खात्यांमधील जमा किंवा नावे बाकीवर काहीही व्याज दिले/आकारले जाणार नाही.

१०. **प्रतिष्ठानाची कीर्ती** : प्रतिष्ठानाचे कीर्तिमूल्य हे शून्य असून.भागीदारांपैकी कुणाच्याही निवृत्ती वा मृत्यु प्रसंगी किंवा नवीन भागीदाराच्या प्रवेश प्रसंगी कीर्तिमूल्य त्याच्या किंवा जुन्या भागीदाराच्या संमतीशिवाय विचारात घेतले जाणार नाही.

११. **व्यवसाय व्यवस्थापन:** दोन्ही भागीदार प्रतिष्ठानाच्या व्यवसायात स्वत:ला गुंतवून घेतील व त्याच्या दैनंदिन व्यवस्थापनाकडे लक्ष देतील. परंतू कुठल्याही महत्वाच्या बाबतीतील निर्णय परस्पर बांधिलकीने भागीदाराच्या संमतीविना घेण्यात येईल.

१२. **अधिकोष लेख्यांचे संचालन** : दैनंदीन खर्चास आवश्यक तेवढे सोडून, प्रतिष्ठानास प्राप्त होणारा सर्व पैसा अडका, धनादेश, विकर्ष इत्यादि प्रतिष्ठानाच्या नावाने कुठल्याही राष्ट्रीयकृत, अनुसूचित वा सहकारी अधिकोषांत खाते उघडून त्यात जमा केले जातील. अशा खात्यांचे संचालन भागीदारांनी परस्पर संमतीने ठरविल्याप्रमाणे **भागीदारांच्या संयुक्त स्वाक्षरीने** करेल.

**१३ लेखा पुस्तके** : संस्थेच्या व्यवसायाशी संबंधित लेखापुस्तके नियमितपणे ठेवली जातील. प्रत्येक लेखावर्षाच्या अखेरीस लेखापुस्तकांचे संवरण करुन लेखा वर्षाच्या शेवटी लाभालाभ लेखा व स्थिती विवरण तयार केलेल्या विवरणांवर सर्व भागीदार ते बरोबर असून आपणास मान्य असल्याने निदर्शक म्हणून त्यावर हस्ताक्षरे करतील व अशी परिस्थिती खेरीज करुन जेव्हा त्यात काही चूक आढळून येईल, जी सत्वर सुधारण्यात येईल, अशी विवरणें ही अंतीम व सर्व भागीदारांवर बंधनकारक मानली जातील.

**१४. भागीदारीचा कालावधी** : भागीदारी **"मर्जितोवर"** राहील. कुणा भागीदारास भागीदारीतून निवृत्त व्हावयाचे असल्यास त्याने इतर भागीदारांस आपल्या त्या मनोदयाचा स्पष्ट उल्लेख असलेली लेखी सूचना सात दिवसा आधी द्यावी. सूचनेचा कालावधी संपण्याच्या अखेरच्या दिवशी तो भागीदार असणे संपूष्टात येईल. त्या दिवशी पर्यंतचे त्याचे हिशेब, ज्यांत त्याच्या हिश्याची लाभ—हानी संपत्ती व देयता यांतील हिस्सा इ. चा अंतर्भाव असेल, तयार करण्यात येऊन त्याचे शोधन भागीदार परस्पर संमतीने ठरवतील त्या पध्दतीने व मुदतीत केले जाईल.

**१५. कर्ज उभारणे** : भागीदारास अधिक भांडवलाची आवश्यकता भासल्यास असे भांडवल कर्ज वा हुंडीच्या रूपात उभारले जाऊ शकेल व त्यावर बाजारभावाने व्याज दिले जाईल. हे व्याज भागीदारीच्या हिशेबात खर्च म्हणून दाखविले जाईल. मग व्यवसायात लाभ असो वा हानि. तथापि पद्रक्ष क्र. १ च्या संमतीने कर्ज काढले जाईल.

**१६. भागीदारांचे उत्तरदायित्व** : कुणीही भागीदार अन्य भागीदारांच्या लेखी अनुमतीविना खालील कृत्ये करु शकणार नाही.

१. कुणाही व्यक्तीस अन्य भागीदारांच्या लेखी अनुमतीविना भागीदारीत प्रवेश देणे.

२. व्यवसायाच्या नेहमीच्या सर्वसाधारण प्रथेखेरीज अन्यथा प्रतिष्ठानाची मालमत्ता, पैसा अडका वापरणे वा त्याची पत गहाण ठेवणे.

३. कुणाही व्यक्तीसह किंवा साठी, जामीन राहणे, हमी देणे, प्रतिभूति देणे, किंवा असे कृत्य करणे, जेणे करुन कुठल्याही न्यायालयान आदेशाच्या पालनार्थ प्रतिष्ठानाच्या संपत्तीस किंवा त्यातील काही भागास हानी पोहचेल किंवा त्यावर जप्ती येऊ शकेल.

४. स्वत:च्या वैयक्तिक दायित्वाच्या परिपालनार्थ प्रतिष्ठानाची संपत्ती किंवा तीमधील त्याचे हितावर दायित्व उत्पन्न होईल असे काही करणे.

५. जेणेकरुन प्रतिष्ठान किंवा त्याची संपत्ती पूर्वग्रहदूषित होईल असे कुठलेहि कृत्य करणे, विशेषकरुन व्यवसाय गुपिताचे रहस्योदघाटन करणे.

१७. सर्व भागीदारांनी आपसात ठरविले की सर्वाच्या संमतीनेच भागीदारीत नवीन भागीदार समाविष्ठ करणे किंवा बदलविने तसेच कुठलाही नवीन मुद्दा भागीदारी विलेखात समाविष्ठ करणे अथवा गाळणे हे सर्वांच्या संमतीने होईल.

१८. **लवाद :** भागीदारी सुरु असता वा त्यानंतर भागीदारांस किंवा त्यांच्या प्रतिनिधींमध्ये, या विलेखाची रचना, त्याचे अर्थ व परिणाम, किंवा त्यातील काही भागाबद्दल, किंवा हिशेब, लाभालाभ लेखे याबद्दल किंवा भागीदारांच्या अधिकार व देयतांबद्दल किंवा त्यांच्या त्यातील हिताबद्दल किंवा प्रतिष्ठानाशी संबंधित असणाऱ्या मुद्द्यांबद्दल कुठलेही मतभेद वा विवाद उत्पन्न झाल्यास असे विवाद प्रत्येक पक्षाने नेमावयाच्या लवादांसमोर व जेव्हा लवादांमध्ये मतैक्य न झाल्यास लवाद अधिनियमांतील तरतूदींना अनुसरुन त्यांनी पूर्वीच नेमलेल्या पंचासमोर निर्णयार्थ सादर करण्यात येतील. लवादांचे वा पंचाचे निर्णय हे अंतिम व संबंधित सर्व पक्षांवर बंधनकारक राहतील.

ज्या संबंधी या विलेखात स्पष्टपणे प्रावधान केलेले नाही अशा सर्व बाबतीत भागीदारी अधिनियम १९३२, वेळोवळी संशोधित, मधील तत्संबंधी प्रावधाने लागू राहतील.

ज्यास साक्ष प्रमाण म्हणून या विलेखातील पक्षांनी वर प्रथम उल्लेखित दिनांकास आपापल्या स्वाक्षऱ्या केल्यात.

साक्षीदार

१. सही
नाव:– राहुल मुकुंदा बन्सोड
पत्ता :– 202, मोहित अपार्टमेन्ट आशिर्वाद नगर, नागपुर

२. सही
नाव:– पंकज विठ्ठलराव मसेकर
पत्ता :– 72, साईबाबा नगर, दिघोरी, नागपुर

भागीदार

१. सही
श्री. संजय वल्द मधुकरराव महाकाळकर.

२. सही
श्री. नंदलाल वल्द हरिलाल शाहू

ATTESTED
10/7/2021
PURUSHOTTAM N. PORKUTE
NOTARY
GOVT. OF INDIA

NOTARY
INDIA

NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL